# S.V.P. Arts & Science College Ainpur

## 7.1.9 : Sensitization of students and employees of the Institution to the constitutional obligation: value rights, duties and responsibilities of citizen

The Year 2020-21 was the Corona Pandemic year, so college arranged and successfully organized the different programmes online regarding inclusive environment among the student and society. Different programmes are follows

| Sr. No. | Name of programme | Date | Male | Female | Total |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Consumerism & Financial Literacy in COVID-19 Times : For Students | 16-09-2020 | **176** | **88** | **264** |
| 2. | Consumerism & Financial Literacy in COVID-19 Times : For Academicians | 17-09-2020 | **38** | **107** | **145** |
| 3. | Consumerism &Financial Literacy in COVID-19 Times: FOR Adults and GENERAL PUBLIC | 18-09-2020 | **43** | **99** | **142** |
| 4. | National Service Scheme Establishment Day | 24-09-2020 | 36 | 64 | 100 |
| 5. | Free Firecracker Diwali | 13-11-2020 | **42** | **58** | **100** |
| 6. | Human Rights Day and Voter Registration Program | 10-12-2020 | | | |
| 7. | Vasundhara Din | 01-01-2021 | | | |
| 8. | Mazi Vasundhara Abhiyan 01_15 Jan. 2021<br>HaritShapath | 04-01-2021 | **47** | **37** | **84** |
| 9. | Intellectual Property Rights | 16-03-2021 | **164** | **297** | **461** |
| 10. | Consumerism and Financial Literacy in COVID-19 Times : For Students | 29-04-2021 | | | |
| 11. | Consumerism and Financial Literacy as part of Global Money week - 2021 | 30-04-2021 | | | |

Sardar V.P. Arts & Sci. College AINPUR Pin 425507 Dist-Jalgaon

Principal
Sardar V. P. Arts & Science College
Ainpur, Tal. Raver. Dist- Jalgaon

**1.** Consumerism & Financial Literacy in COVID-19 Times : For Students




दैनिक **लोकशाही**

# ऐनपूर महाविद्यालयात उपभोक्तावाद व वित्तीय साक्षरता या विषयावर राष्ट्रीय वेबिनार

रावेर ✍ प्रतिनिधी

ऐनपूर परिसर शिक्षण प्रसारक मंडळाचे सरदार वल्लभभाई पटेल कला आणि विज्ञान महाविद्यालय, ऐनपूर तथा कन्झ्युमर गाईडन्स सोसायटी ऑफ इंडिया मुंबई यांच्या संयुक्त विद्यमानाने दि.१६ सप्टेंबर २०२० रोजी विद्यार्थ्यांसाठी आयोजित उपभोक्ता आणि वित्तीय साक्षरता या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय वेबिनारचे आयोजन यशस्वीरित्या करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे ग्रंथपाल तथा कार्यक्रमाचे समन्वयक डॉ.संदीप साळुंके यांनी केले या नंतर प्रकल्प व्यवस्थापक टी.आर.पांडे यांनी कन्झ्युमर गाइडन्स सोसायटी ऑफ इंडिया यांच्या कार्याची ओळख करून दिली. यानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात वेबीनारबद्दल मार्गदर्शन करताना वेबीनारचा उद्देश हा विद्यार्थ्यांना विषद करून दिला. तसेच ग्राहक व त्याचे अधिकार त्याचबरोबर वित्तीय व्यवस्थापन व वित्तीय साक्षरता याबद्दल चे महत्त्व विषद केले.

यानंतर पहिले सत्रात संतोष शुक्ला यांनी त्यांच्या मार्गदर्शनपर सत्रात ग्राहक व ग्राहकांचे अधिकार, ग्राहक साक्षरता तसेच आज वेगवेगळ्या जाहिरात माध्यमातून ग्राहकांची होणारी फसवणूक व त्यावर ग्राहकांनी करावयाची उपाययोजना यावर सखोल असे मार्गदर्शन केले. यानंतर दुसऱ्या सत्रात स्टीव्हन फर्नांडिस यांनी वित्तीय साक्षरता या विषयावर मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांनी आजपासूनच वित्तीय व्यवस्थापन कसे करावे वित्तीय व्यवस्थापन करताना आपल्याला भविष्यकाळात उद्भवणाऱ्या वित्तीय आवश्यकता तसेच आपले वित्तीय ध्येय निश्चित करण्याची का गरज आहे हे समजून सांगण्यासाठी विविध अशा उदाहरणांनी स्पष्ट करून दिले. या एक दिवसीय राष्ट्रीय वेबीनारला एकूण १८१ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त असा सहभाग नोंदवला. प्रत्येक सत्राच्या शेवटी प्रश्नोत्तराच्या काळात विद्यार्थ्यांनी तज्ज्ञांशी हितगुज केले त्यांच्या मनात असलेल्या शंका त्यांनी तज्ज्ञांसमोर मांडल्या तसेच यावर मार्गदर्शकांनी विद्यार्थ्यांना सखोल असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्राचार्य डॉ.जे.बी. अंजने, कार्यक्रमाचे समन्वयक डॉ.संदीप साळुंके, सहसमन्वयक प्रा.एच.एम. बाविस्कर तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रयत्न केले. यानंतर प्रा.एच.एम.बाविस्कर यांनी कार्यक्रमास उपस्थित सर्व मान्यवरांचे तथा कार्यक्रमास लाभलेले तज्ञ मार्गदर्शक यांचे आभार मानले. यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष यांच्या अनुमतीने कार्यक्रमाची सांगता झाली.


Lokshahi Main Edition
17 Sep, 2020 Page No. 5
Powered by : erelego.com


Sardar V.P. Arts & Sci. College AINPUR Pin 425507 Dist-Jalgaon

Principal
Sardar V. P. Arts & Science College
Ainpur, Tal. Raver. Dist- Jalgaon

## 2. Consumerism & Financial Literacy in COVID-19 Times : For Academicians




दैनिक **लोकशाही**

# फसव्या जाहिरातींना बळी पडू नका- सौ. जम्ना वर्धाचारी

**रावेर** ✍ प्रतिनिधी

ऐनपूर परिसर शिक्षण प्रसारक मंडळाचे सरदार वल्लभभाई पटेल कला आणि विज्ञान महाविद्यालय, ऐनपूर तथा कन्झ्युमर गाईडन्स सोसायटी ऑफ इंडिया मुंबई यांच्या संयुक्त विद्यमानाने दि.१७ सप्टेंबर २०२० रोजी महाविद्यालयातील व विद्यापिठातील प्राध्यापकांसाठी आयोजित उपभोक्ता आणि वित्तीय साक्षरता या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय वेबिनारचे आयोजन यशस्वीरित्या करण्यात आले.

सलग तीन दिवस बेबिनारचे आयोजन करून पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना आज प्राध्यापकांना व उद्या समाजातील जागृत नागरिकांना सदर विषयावर मार्गदर्शन करण्यात येत आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे ग्रंथपाल तथा कार्यक्रमाचे समन्वयक डॉ.संदीप साळुंके यांनी केले या नंतर प्रकल्प व्यवस्थापक टी.आर.पांडे यांनी कन्झ्युमर गाइडन्स सोसायटी ऑफ इंडिया यांच्या कार्याची ओळख करून दिली. यानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात वेबीनारबद्दल मार्गदर्शन करताना ग्राहक म्हणून आ-पले अधिकार तथा आपल्या भविष्यकालीन आर्थिक व्यवस्थापन याचे महत्त्व विषद केले.

यानंतर पहिले सत्रात सौ.जम्ना वर्धाचारी, सहसचिव, कन्झुमर गाईडन्स सोसायटी ऑफ इंडिया, मुबई यांनी त्यांच्या मार्गदर्शन पर सत्रात ग्राहक व ग्राहकांचे अधिकार, ग्राहक साक्षरता तसेच आज वेगवेगळ्या जाहिरात माध्यमातून ग्राहकांची होणारी फसवणूक व त्यावर ग्राहकांनी करावयाची उपाययोजना यावर सखोल असे मार्गदर्शन केले. त्यानंतर त्यांनी ग्राहक हीत कायद्याबद्दल माहिती दिली. या सत्रानंतर सहभागी प्राध्यापकांना ग्राहकपाल ध्वनीचित्र फित दाखविण्यात आली.

यानंतर दुसऱ्या सत्रात डॉ.हरदीप कौर यांनी वित्तीय साक्षरता या विषयावर मार्गदर्शन करताना आपल्याला दुहेरी उत्पन्न स्त्रोत याबद्दल विचार करणे गरजेचे आहे असा सल्ला त्यांनी दिला. वित्तीय व्यवस्थापन करताना आपल्याला भविष्यकाळात उद्भवणाऱ्या वित्तीय आवश्यकता तसेच आपले वित्तीय ध्येय निश्चित करण्याची का गरज आहे हे समजून सांगण्यासाठी विविध योजनांची माहिती त्यांनी दिली.

या एक दिवसीय राष्ट्रीय वेबीनारला एकूण १४३ प्राध्यापकांनी सहभाग घेतला. दोन्ही सत्राच्या शेवटी प्रश्नोत्तराच्या काळात तज्ज्ञांशी हितगुज झाले व त्यांच्या मनात असलेल्या शंका त्यांनी तज्ज्ञांसमोर मांडल्या त्यावर मार्गदर्शकांनी सखोल असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने, कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. संदीप साळुंके, सह-समन्वयक प्रा.एच.एम .बाविस्कर तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रयत्न केले. यानंतर डॉ.प्रवीण आर.महाजन यांनी कार्यक्रमास उपस्थित सर्व मान्यवरांचे तथा कार्यक्रमास लाभलेले तज्ञ मार्गदर्शक यांचे आभार मानले. यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष यांच्या अनुमतीने कार्यक्रमाची सांगता झाली.

Lokshahi Main Edition
18 Sep, 2020 Page No. 5
Powered by : erelego.com

Sardar V.P. Arts & Sci College AINPUR Pin 425507 Dist-Jalgaon

Principal
Sardar V. P. Arts & Science College
Ainpur, Tal. Raver. Dist- Jalgaon

**3.** Consumerism &Financial Literacy in COVID-19 Times: FOR Adults and GENERAL PUBLI)






# जनतेची आर्थिक साक्षरता ही काळाची गरज : नंदकुमार मेनन

## ऐनपूर महाविद्यालय आयोजित वेबिनारमध्ये मान्यवरांनी केले मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा**
**ऐनपूर, १८ सप्टेंबर**

ऐनपूर परिसर शिक्षण प्रसारक मंडळाचे सरदार वल्लभभाई पटेल कला आणि विज्ञान महाविद्यालय, ऐनपूर तथा कन्झ्युमर गाईडन्स सोसायटी ऑफ इंडिया मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने १६ ते १८ सप्टेंबरला विविध घटकांसाठी चालणाऱ्या वेबिनारचे शुक्रवारी सर्वसामान्य जनतेसाठी आयोजित उपभोक्ता आणि वित्तीय साक्षरता या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय वेबिनारचे आयोजन करण्यात आले. सलग तीन दिवस बेबिनारचे शृंखलेचं आयोजन करून पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना, दुसऱ्या दिवशी प्राध्यापकांना व १८ रोजी समाजातील जागृत नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले.

प्रास्ताविक महाविद्यालयाचे ग्रंथपाल तथा कार्यक्रम समन्वयक डॉ. संदीप साळुंके यांनी केले. यानंतर प्रकल्प व्यवस्थापक टी. आर. पांडे यांनी कन्झ्युमर गाइडन्स सोसायटी ऑफ इंडिया यांच्या कार्याची ओळख करून दिली. यानंतर प्राचार्य डॉ.जे.बी. अंजने यांनी अध्यक्षीय भाषणात वेबीनारबद्दल मार्गदर्शन करताना ग्राहक म्हणून आपले अधिकार तथा आपल्या भविष्यकालीन आर्थिक व्यवस्थापन याचे महत्व विषद केले. यानंतर पहिले सत्रात, डॉ. एम. एस. कामत, जनरल सेक्रेटरी कन्झुमर गाईडन्स सोसायटी ऑफ इंडिया, मुबई यांनी ग्राहक व ग्राहकांचे अधिकार, ग्राहक साक्षरता तसेच वेगवेगळ्या जाहिरात माध्यमातून ग्राहकांची होणारी फसवणूक व त्यावर ग्राहकांनी करावयाची उपाययोजना यावर मार्गदर्शन केले. यानंतर दुसऱ्या सत्रात नंदकुमार मेनन यांनी जनतेने आर्थिक साक्षर होणे का गरजेचे आहे या विषयी मार्दर्शन केले. आपल्याला उत्पन्नाचे अनेकविध स्रोत याबद्दल विचार करणे गरजेचे आहे, असा सल्ला त्यांनी दिला. वित्तीय व्यवस्थापन करताना भविष्यकाळात उद्भवणाऱ्या वित्तीय आवश्यकता, वित्तीय ध्येय निश्चित करण्याची का गरज आहे हे समजून सांगण्यासाठी विविध योजनांची माहिती त्यांनी दिली.

या राष्ट्रीय वेबीनारला १२० जणांनी सहभाग नोंदविला. ऐनपूर परिसर शिक्षण प्रसारक मंडळाचे प्रतिनिधी उपस्थित होते. दोन्ही सत्राच्या शेवटी प्रश्नोत्तराच्या काळात तज्ज्ञांशी हितगुज झाले व त्यांच्या मनात असलेल्या शंका त्यांनी तज्ज्ञांसमोर मांडल्या. तसेच यावर मार्गदर्शकांनी सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रम यशस्वितेसाठी प्राचार्य डॉ.जे.बी. अंजने, समन्वयक डॉ. संदीप साळुंके, सह-समन्वयक प्रा. एच.एम.बाविस्करांसह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी प्रयत्न केले. यानंतर डॉ. प्रवीण महाजन यांनी कार्यक्रमास उपस्थित मान्यवर व तज्ञ मार्गदर्शकांचे आभार मानले. यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष यांच्या अनुमतीने कार्यक्रमाची सांगता झाली.

त्याआधी १६ रोजी विद्यार्थ्यांना 'उपभोक्ता आणि वित्तीय साक्षरता' या विषयावर संतोष शुक्ला व स्टीव्हन फर्नांडिस यांनी तर १७ रोजी प्राध्यापकांना जम्ना वर्धाचारी (मुंबई) व डॉ. हरदिप कौर यांनी मार्गदर्शन केले होते.


हे वृत्तपत्र माधव बहुउद्देशीय प्रतिष्ठान जळगावसाठी * निवासी संपादक : दिनेश विठ्ठलराव दगडकर यांनी पी.एम.उद्योग, डी-
.पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी * निवासी संपादक यांची आहे. ■आर
.■फोन : ०२५७ - २२४२०३१, २२४२०३२, फॅक्स : २२४२०३३. ■E-mail - editor.tarunbl


Sardar V.P. Arts & Sci. College AINPUR Pin 425507 Dist-Jalgaon

Principal
Sardar V. P. Arts & Science College
Ainpur, Tal. Raver. Dist- Jalgaon

**4.** National Service Scheme Establishment Day Participants : Female=64 , Male=36 Total=100




# स.व.प. महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस साजरा

**रावेर** ✍ प्रतिनिधी

ऐनपूर येथील सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना एककातर्फे राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस साजरा करण्यात आला.

सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्राचार्य डॉ. जे.बी.अंजने हे होते. सदर कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा.डॉ.पी.आर.महाजन व रासेयोचे विभागीय समन्वयक प्रा.डॉ.जी.आर.ढेंबरे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी डॉ.जयंत नेहेते यांनी केले. प्रा.डॉ. पी.आर.महाजन यांनी आपल्या मार्गदर्शनपर व्याख्यानात विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजना ची मुल्य, उद्दिष्ट व इतिहास सविस्तरपणे समजावून सांगितला. प्रा.डॉ.जी.आर. ढेंबरे यांनी आपल्या मार्गदर्शनपर व्याख्यानात रासेयो स्वयंसेवकाने समाज विकासासाठी तसेच जनजागृती करण्यासाठी स्वत: ला झोकून दिले पाहिजे. आपल्या हक्का बरोबर कर्तव्यांची जाण ठेवली पाहिजे असे सांगितले. तसेच आज समाजात




राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्थापनेची उद्दिष्ट पूर्ण होतांना दिसतात असेही ते म्हणाले. प्राचार्य डॉ. जे.बी.अंजने यांनी अध्यक्षीय भाषणात स्वयंसेवकांना रासेयो स्थापना दिवसाच्या शुभेछा देऊन मार्गदर्शन केले. त्यांनी राष्ट्रीय सेवा योजना म्हणजे संस्कारांची शाळा होय असे प्रतिपादन केले. तसेच रासेयो स्वयंसेवकांनी माझे कुटुंब माझी जबाबदारी या मोहिमेमध्ये आपले योगदान दिले पाहिजे असे सांगितले. सूत्रसंचालन कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. जयंत नेहेते तर आभारप्रदर्शन सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. दिपक पाटील यांनी केले.

सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ.जे.बी. अंजने यांचे मार्गदर्शन लाभले. प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. सदर कार्यक्रमाला एकूण १०० स्वयंसेवक व प्राध्यापक उपस्थित होते.

Sardar V.P Arts & Sci College AINPUR Pin 425507 Dist-Jalgaon

Principal
Sardar V. P. Arts & Science College
Ainpur, Tal. Raver. Dist- Jalgaon

## 5. Free Firecracker Diwali






दैनिक लोकशाही

# फटाके मुक्त दिवाळीमुळे पर्यावरणाचे प्रदूषण टाळता येईल

रावेर ✍ प्रतिनिधी

येथील सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना एकका तर्फे सामाजिक बांधिलकी म्हणून १३ नोव्हेंबर २०२० रोजी फटाके मुक्त दिवाळी या विषयावर व्याख्यानाचे आयोजन झूम वरती ऑनलाईन पद्धतीने करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने हे होते. सदर कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते व मार्गदर्शक म्हणून अण्णासाहेब जी.डी.बेंडाळे महिला महाविद्यालयाचे प्रा.डॉ. व्ही.जे.पाटील हे उपस्थित होते. या कोविड-१९ महामारीच्या काळात राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी समाजामध्ये फटाके मुक्त दिवाळी याबद्दल जनजागृती केली पाहिजे असे डॉ.व्ही. जे.पाटील यांनी मार्गदर्शन करतांना विद्यार्थ्यांना सांगितले. तसेच फटाक्यांमुळे पर्यावरणात विष-ारी वायूचे प्रमाण वाढते व ऑक्सिजनचे प्रमाण कमी होते त्यामुळे लोकांना श्वसनाचा त्रास होतो. म्हणून पर्यावरणात कोणत्याही प्रकारचे प्रदूषण होणार नाही याची आपण सगळ्यांनी काळजी घ्यायला हवी. तसेच फटाके मुक्त दिवाळीसाठी फक्त कार्यक्रम घेऊन चालणार नाही तर याची कृती केली पाहिजे असेही ते म्हणाले. यानंतर सचिन महाजन व आरती पाटील या दोन स्वयंसेवकांनी फटाकेमुक्त दिवाळी बद्दल आपले मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप करतांना प्राचार्य डॉ. जे.बी.अंजने यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी या कोविड-१९ महामारीच्या काळात फटाके खरेदी न करता गरजू लोकांना मदत केली पाहिजे. तसेच आपण केलेल्या मदतीमुळे एखाद्या कुटुंबाच्या चेहऱ्यावर जो आनंद दिसतो तोच खरा सर्वश्रेष्ठ आनंद आहे असे ते म्हणाले. प्रत्येकाने किमान पाच कुटुंबांपर्यंत फटाके मुक्त दिवाळीचा संदेश पोहचवावा असे आवाहनही त्यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.जे.पी.नेहेते यांनी तर आभार सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.डी.बी.पाटील यांनी मानले. सदर कार्यक्रमासाठी एकूण १०० प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक तसेच महाविद्यायातील विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा.डॉ.जे.पी. नेहेते, प्रा.डॉ.आर.व्ही.भोळे, प्रा.एस.एस.साळुंके, प्रा.डॉ.डी. बी.पाटील व प्रा.डॉ.एस.एन. वैष्णव यांनी परिश्रम घेतले.


LOKSHAHI Main Edition
Nov 14, 2020 Page No.
Powered by : eReleGo.com




## 6. Human Rights Day and Voter Registration Program







Principal
Sardar V. P. Arts & Science College
Ainpur, Tal. Raver. Dist- Jalgaon

# ऐनपूर येथे मानवी हक्क दिनानिमित्त मतदान नोंदणी जनजागृती अभियान

**तभा वृत्तसेवा**
**रावेर, १० डिसेंबर**

ऐनपूर येथिल सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयात जागतिक मानवी हक्क दिन आणि मतदार नोंदणी जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने होते. प्रमुख वक्ते व्ही. एस. नाईक महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. एस. डी. धापसे होते. त्यांनी जागतिक मानवी हक्क दिवस या विषयावरील व्याख्यानात असे म्हटले की, जगातील सर्व माणसे जन्मतः स्वतंत्र आणि समान असून मानवाला काही हक्क निसर्गतः जन्मजात मिळतात. म्हणूनच मानवाचे हे अधिकार स्थळ, काळ, परिस्थितीवर असतात. तसेच पुढे म्हणाले की, प्रत्येक व्यक्ती ही समाजाची घटक असल्याने त्यास अधिकार प्राप्त झाले आहेत.



म्हणूनच प्रत्येकाने आपल्या हक्काची जोपासणूक करतांना इतरांच्या हक्कांवर अतिक्रमण होणार नाही याची दक्षता घ्यावी.

प्रा. एच. एम. बाविस्कर यांनी जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून भारताकडे पाहिले जाते. आपल्या देशाला व संसदीय लोकशाहीला बळकटीसाठी आपण सर्वांनी मतदान केले पाहिजे आणि जे नवमतदार आहेत त्यांनी नोंदणी करा असे आवाहन केली आहे.

अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने यांनी असे म्हटले की १० डिसेंबर १९४८ रोजी संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेत मानवी हक्कांचे जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आले होते. म्हणूनच आज संपूर्ण जगात मानवाधिकार दिवस साजरा करण्यात येतो तसेच महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी मतदार नोंदणी करावे असे आवाहन केले आहे.

कार्यक्रम महाविद्यालयाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. सूत्रसंचालन, आभार प्रा. एस. पी. उमरीवाड यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा.एस. पी.उमरीवाड, प्रा.एच.एम. बाविस्कर यांनी परिश्रम घेतले.

**7.** Vasundhara Din**:**

दिव्य मराठी भुसावळ 02-01-2021

# सरदार पटेल महाविद्यालयात वसुंधरा दिन साजरा

**प्रतिनिधी** | ऐनपूर

ऐनपूर (ता.रावेर) येथील सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयात वसुंधरा दिनानिमित्त पर्यावरण संतुलन जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन केले होते. १ जानेवारीला झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने होते.

१ जानेवारी हा दिवस जागतिक वसुंधरा दिवस म्हणून जगभर साजरा केला जातो. हे औचित्य साधून महाविद्यालयातील विद्यार्थी विकास अधिकारी प्रा.एस.पी. उमरीवाड यांनी विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सामूहिक हरित शपथ दिली. प्राचार्य डॉ.अंजने यांनी, आपला परिसर, घर, गाव, सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता राखणे ही आपली प्रत्येकाची सामाजिक जबाबदारी आहे. तसेच प्लॉस्टिकच्या वस्तू, कॅरिबॅगचा वापर टाळावा. पर्यावरण संवर्धनासाठी तसेच प्रत्येकाने दर वर्षी एक झाड लावावे. त्याचे प्रामाणिकपणे संवर्धन देखील करावे. उपलब्ध पाण्याचा वापर काटकसरीने करावा, असे आवाहन सूत्रसंचालन प्रा.डॉ.संदीप साळुंके, तर आभार प्रा.एस.पी.उमरीवाड यांनी मानले.

Sardar V.P Arts & Sci College AINPUR Pin 425507 Dist-Jalgaon

Principal
Sardar V. P. Arts & Science College
Ainpur, Tal. Raver. Dist- Jalgaon

**8.** Mazi Vasundhara Abhiyan 01_15 Jan. 2021 HaritShapath



# ऐनपूर महाविद्यालयात घेतली वसुंधरा अभियानांतर्गत हरित शपथ

▶▶ रावेर । प्रतिनिधी

**देशदूत**

ऐनपूर महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना एककातर्फे हरितशपथ घेण्यात आली. दि.०१ ते १५ जानेवारी या कालावधीत माझी वसुंधरा हे अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाअंतर्गत पर्यावरण रक्षणाच्या अनुषंगाने हरितशपथ घेण्याचे आयोजन महाविद्यालयातर्फे करण्यात आले होते.रासेयो प्रतिनिधी सचिन महाजन व ऋषिकेश महाजन यांनी उपस्थित विद्यार्थी, प्राध्यापक, प्राध्यापकेत्तर कर्मचारी यांना सामुहीक हरित शपथ दिली.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. प्लास्टिकचा वापर करायला नको, पर्यावरणाचे रक्षण करून त्याच्याबद्दल जनजागृती केली पाहिजे असेही ते म्हणाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. जे. पी. नेहेते यांनी तर आभार सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ.डी.बी. पाटील यांनी मानले. सदर कार्यक्रमासाठी एकूण ८४ प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक तसेच महाविद्यायातील विद्यार्थी उपस्थित होते.



Sardar V.P. Arts & Sci College AINPUR Pin 425507 Dist-Jalgaon

Principal
Sardar V. P. Arts & Science College
Ainpur, Tal. Raver. Dist- Jalgaon

## 9. Intellectual Property Rights






तरुण भारत    ग्रा मी ण    जळगाव, गुरुवार, १८ मार्च २०२१    ६

# 'बौद्धिक संपदा हक्क' विषयावर राष्ट्रीय सेमिनार उत्साहात

## बौध्दिक संपदा हक्काने स्वामित्व बहाल करण्यात येते- डॉ. विक्रम सुवर्णकार

तभा वृत्तसेवा
रावेर, १७ मार्च

तालुक्यातील ऐनपूर येथील सरदार वल्लभभाई पटेल कला आणि विज्ञान महाविद्यालय, ऐनपूर येथील ज्ञानस्रोत केंद्र (ग्रंथालय) आणि आय. क्यू. ए. सी. यांच्या संयुक्त विद्यमाने बौद्धिक संपदा हक्क या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय सेमिनारचे आयोजन यशस्वीरित्या करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. के. जी. कोल्हे यांनी केले त्यात त्यांनी बौद्धिक संपदा हक्क याची प्रासंगिकता तसेच त्याची व्याप्ती या विषयी माहिती देऊन हे सेमिनार सहभागी मान्यवरांना कश्या प्रकारे उपयोगी ठरणार आहे या विषयी सांगितले.

त्यानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य तथा सेमिनारचे चेअरमन डॉ. जे. बी. अंजने यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात बौद्धिक संपदा हक्क या विषयाचे सेमिनार आयोजनाबद्दल चे महत्व सांगितले तसेच या संबंधी असलेल्या शिखर संस्था व त्यांना बौद्धिक संपदा हक्क या बद्दल असलेले कार्य या बद्दल विवेचन केले.

सेमिनारसाठी पुण्याच्या डी. वाय. पाटील इंन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी, पुणे येथील डॉ. विक्रम सुवर्णकार यांचा परिचय डॉ. एस. एन. वैष्णव यांनी करून दिला. विशेष बाब म्हणजे डॉ. विक्रम सुवर्णकार यांनी आजपर्यंत एकूण १७ पेटंटची नोंदणी केलेली आहे. आपल्या व्याख्यानात डॉ. विक्रम सुवर्णकार यांनी सर्वप्रथम वाङ्मयचौर्याच्या वाढत्या समस्या बौद्धिक संपदे विषयी सर्वसाधारण माहितीचे विवेचन केले. तसेच बौद्धिक संपदाच्या निगडीत विविध पैलूवर प्रकाश टाकला. यानंतर वाङ्मयचौर्याच्या दुसऱ्या सत्रात पेटंट विषयी मार्गदर्शन केले. सत्रात त्यांनी पेटंट विषयी माहिती देऊन प्रत्यक्ष पेटंट नोंदणी पर्यंतची माहिती दिली.

या संदर्भात असलेले विविध कायदेविषयक तरतुदी व संशोधकाला मिळणाऱ्या विविध संधी या बद्दल सखोल मार्गदर्शन केले. सत्राच्या शेवटी प्रश्नोत्तराच्या काळात तज्ज्ञांशी हितगुज झाले व त्यांच्या मनात असलेल्या शंका त्यांनी तज्ज्ञांसमोर मांडल्या यावर मार्गदर्शकांनी मार्गदर्शन केले.

सेमिनारच्या समारोप प्रसंगी सहभागी प्राध्यापकांनी मनोगते व्यक्त करताना सांगितले की वक्त्यांनी आपल्या सादरीकरणात दोन्ही सत्रात खूप छान माहिती दिली प्राचार्य डॉ जे बी अंजने यांनी समारोपप्रसंगी बोलताना सांगितले की बौद्धिक संपदा हक्क याविषयी विद्यार्थी, संशोधक, व्यवस्थापक यांना जाणिव होण्याची गरज आहे.

या एक दिवसीय राष्ट्रीय सेमीनारला एकूण ४६१ सहभागी यांची नोंद झाली. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी कार्यक्रमाचे प्रमुख प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने, कार्यक्रमाचे संयोजक डॉ. के. जी. कोल्हे, कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. एस. एन. वैष्णव, कार्यक्रमाचे आयोजन सचिव डॉ. संदीप साळुंके, तसेच सदस्य डॉ. पी. आर. महाजन, प्रा. एच. एम. बाविस्कर, प्रा. एस. बी. महाजन, डॉ. डी. बी. पाटील तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रयत्न केले. डॉ. प्रवीण आर. महाजन यांनी कार्यक्रमास उपस्थित सर्व मान्यवरांचे तथा कार्यक्रमास लाभलेले तज्ञ मार्गदर्शक यांचे आभार मानले.

Sardar V.P Arts & Sci College AINPUR Pin 425507 Dist-Jalgaon

Principal
Sardar V. P. Arts & Science College
Ainpur, Tal. Raver. Dist- Jalgaon

**10.** Consumerism and Financial Literacy in Covid 19 Times : For Students




Principal
Sardar V. P. Arts & Science College
Ainpur, Tal. Raver. Dist- Jalgaon

Ainpur Parisar Shikshan Prasarak Mandal's Sardar Vallabhbhai Patel Arts &Science College

Organising Webinar in association with Consumer Guidance Society of India on "Consumerism and Financial Literacy in Covid 19 Times"

FOR Students

Date and Time: 29th April 2021, 11:00 AM onwards

Platform : ZOOM

Key Speakers Topic

Session I

Mr. T. R. Pandey ( Project Manager - CGSI) - Consumerism

Session II

DR. HARDEEP KAUR ( Finacial Advisor) - Finacial Literacy

Registration Link

https://docs.google.com/forms/d/e/1FAIpQLScrYo4TtD7RlfUBPgqa60Y3Zp2WU39VR_WxoigERXm8Divrlw/viewform

Note

1. No Registration Fee

2. e-Certificate will be issued after full participation and filling in Feedback Form

3. Financial Awareness e-book published by RBI will be distributed to all participants.

4. Please input a correct name, email address to get the correct name printed on E-certificate.

**11.** Consumerism and Financial Literacy in Covid 19 Times : For Students







Sardar V.P Arts & Sci College AINPUR Pin 425507 Dist-Jalgaon

Principal
Sardar V. P. Arts & Science College
Ainpur, Tal. Raver. Dist- Jalgaon

12. NSS volunteers have served by spraying Sodium Hypochlorite for hygienic and COVID free environment








Sardar V.P Arts & Sci College AINPUR Pin 425507 Dist-Jalgaon

Principal
Sardar V. P. Arts & Science College
Ainpur, Tal. Raver. Dist- Jalgaon









Sardar V.P. Arts & Sci. College
AINPUR
Pin
425507
Dist-Jalgaon

Principal
Sardar V. P. Arts & Science College
Ainpur, Tal. Raver. Dist- Jalgaon







Sardar V.P Arts & Sci College AINPUR Pin 425507 Dist-Jalgaon

Principal
Sardar V. P. Arts & Science College
Ainpur, Tal. Raver. Dist- Jalgaon